नि.फौ.ख.क्र.४८६/२०२४
शासन वि.शेख आसीफ शेख मुस्ताक +२
नि.क्र.२१
**CNR :NO:MHBU06-002285-2024**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : इरफान खान शौकत खान,

वय : ३४ वर्ष,

व्यवसाय : मजुरी ,

राहणार : कोठारी फैल खामगाव , खामगाव,
जिल्हा- बुलढाणा.

सरतपास:

सरतपास, सरकार तर्फे सरकारी वकील, कु. पिंकी नारायणदास पेशवानी यांच्यातर्फे सुरू:

मी, सर्व आरोपींना ओळखतो, कारण ते माझे नातेवाईक आहेत. आज रोजी सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत. घटना कधी घडली मला सांगता येणार नाही, माझ्या पत्नी आणि ननंद मध्ये झाडू मारण्याच्या कारणावरून बोल चार झाली होती. त्या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. मी, रागाच्या भरात पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

२. आता मला सरकारी वकिलांनी मी, दिलेला तोंडी रिपोर्ट दाखविला, त्यातील मजकूर खरा नाही.परंतु त्यावर माझा सही आहे. तोंडी रिपोर्ट वरचे फिर्यादीच्या सहीला निशाणी क्रमांक.२२ देण्यात येत आहे.आता, मला सरकारी वकिलांनी, मी दिलेला एफ.आय .आर

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.02.16 16:49:11 +0530

दाखविला, त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर खरा नाही. एफ.आय.आर वरचे सहीला निशाणी क्रमांक.२३ देण्यात येत आहे. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नाही व माझा जबाब नोंद केला नाही.

सरकारी वकिलांतर्फे सरतपास पूर्ण:
सरकारी वकिलांनी उलटतपासाची परवानगी मागितली, त्यानुसार सरकारी वकिलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.
उलटतपास सरकारी वकिलांतर्फे:

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २३.०६.२०२४ रोजी संकाळी १०.०० वाजेच्या सुमारास मी, संडासला बाहेर गेलो असता, माझी पत्नी घरी एकटी असताना सर्व आरोपी तिथे आली होती व त्यांनी पैशाच्या कारणावरून माझ्या पत्नीला शिवीगाळ दिली होती.हे म्हणे खरे नाही की, सर्व आरोपींनी माझ्या पत्नीला चापट बुक्क्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी घरी आल्यानंतर माझ्या पत्नीने मला सांगितले म्हणून मी व माझी पत्नी आरोपींच्या घरी असे का केले म्हणून विचारण्यात गेली असता आम्हाला आरोपींनी शिवीगाळ केली तसेच आरोपी शेख आसिफ शेख मुस्ताक यांनी

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.02.16 16:49:19 +0530

त्याच्या हातातील लाकडी काठीने माझे उजव्या खांद्याच्या पाठीमागे मारहाण करून जखमी केले होते.हे म्हणे खरे नाही की, सर्व आरोपींनी मला व माझ्या पत्नीला चापट बुक्क्यांनी मारहाण केली शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली होती.हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपी विरुद्ध पोलीस ठाण्यात तोंडी रिपोर्ट दिला होता, व तो रिपोर्ट मी वाचून सही केली होती.

४. आता मला सरकारी वकिलांनी माझ्या तोंडी रिपोर्ट मधला पोर्शन मार्क अ वाचून दाखविला, तो मी, पोलिसांना माझी तोंडी रिपोर्ट देता वेळेस सांगितला नव्हता. मला कारण सांगता येणार नाही की, पोलिसांनी माझ्या तोंडी रिपोर्ट मध्ये पोर्शन मार्क अ का नमूद केला.आता मला सरकारी वकिलांनी माझा जबाब मधला पोर्शन मार्क ब वाचून दाखविला, तो मी, पोलिसांना माझा जबाब देता वेळेस सांगितला नव्हता. मला कारण सांगता येणार नाही की, पोलिसांनी माझ्या जबाब मध्ये पोर्शन मार्क ब का नमूद केला.

५. हे म्हणणे बरोबर आहे की, न्यायालयाचे बाहेर माझे व आरोपी मध्ये तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.02.16 16:49:27 +0530

सोबत भांडण आपसात मिटलेले असल्यामुळे, आरोपीला वाचवण्याकरिता आज मी खोटी साक्षी दिली.

सरकारी वकिलांतर्फे उलट तपास पूर्णण.
उलटतपास आरोपी तर्फे श्री .मोहम्मद अर्षद वकिलांतर्फे: नाकारले.
उलटतपास पूर्ण:
फेरतपास नाही:

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.१६/०२/२०२६

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.02.16 16:49:35 +0530

(एफ.टी.शेख)
सह. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगांव, जिल्हा- बुलढाणा.